रक्षाबंधनच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

शिल्पकार विकासाचा...

देशदूत

९ ऑगस्ट
जागतिक आदिवासी दिवस

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक ३३३ । शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५ । पाने १२+४ | किंमत ₹ ५

वाचा
देशदूत शब्दगंध
रविवार विशेष पुरवणी

राज-का-रण

कार्यकर्त्यांच्या निष्ठेची कसोटी !

विशेष लेख
शतकानंतर आज पाहिली...

आभाळ फाटले तरी...

तेल कंपन्यांना बूस्ट

केंद्रीय मंत्रिमंडळाची ५२.६६७ कोटींच्या पॅकेजला मंजुरी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रीय मंत्रिमंडळाने आज ५२.६६७ कोटी रुपयांच्या पॅकेजला मंजुरी दिली. यात एलपीजी शिक्षण, पायाभूत सुविधा आणि ईशान्येकडील राज्यांच्या विकासासंदर्भातील कामांचा समावेश असून तेल कंपन्यांना ३० हजार कोटींचे अनुदान देण्यात येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीमध्ये पाच महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. केंद्र सरकारने पंतप्रधान उज्ज्वला योजना आणखी बळकट करण्यासाठी १२,०६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

शिक्षण क्षेत्रातही विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी ४२०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

केंद्र सरकारने काही सार्वजनिक तेल वितरण कंपन्यांना अनुदान देण्याला मंजुरी दिली आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपन्यांना एलपीजी विक्रीमध्ये तोटा होत असून, त्याची भरपाई म्हणून ३०००० कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. हे अनुदान नैसर्गिक वायू आणि पेट्रोलियम मंत्रालयाच्या माध्यमातून या कंपन्यांना वितरित केले जाणार आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ याकाळात आंतरराष्ट्रीय बाजारात एलपीजीच्या किमती वाढल्या होत्या. पण ग्राहकांवर वाढलेल्या दराचे ओझे पडू नये म्हणून केंद्राने हे दर स्थिरच ठेवले होते. त्यामुळे तिन्ही कंपन्यांना आर्थिक झळ सोसावी लागली होती.

पूर्वोत्तर राज्यांच्या विकासावर भर

केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत ईशान्य भारतातील राज्यांच्या विकासकामांवरही भर दिला गेला. आसाम, त्रिपुरा या राज्यांसाठी ४,२५० कोटी रुपयांचे विशेष अनुदान पॅकेज देण्याला मंजुरी दिली गेली. दक्षिण भारतातही रस्ते विकास करण्यासाठी मरक्कनम-पुद्दुचेरी हा चार पदरी महामार्ग निर्माण आणि विकासासाठी २,१५७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

बालकावर बिबट्याचा वडनेर दुमालात हल्ला

नाशिकरोड । प्रतिनिधी

वडनेर दुमाला गावात शुक्रवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून एका चार वर्षिय बालकाला जंगलात ओढून नेले. आयुष किरण भगत असे बालकाचे नाव आहे.

बालक घरात नसल्याने त्याच्या आई-वडिलांनी त्याचा शोध सुरू केला असता घराच्या मागी बाजूला रक्त आणि काही अंतरावर पंट सापडली. त्यावरून बिबट्याने हल्ला केल्याचा अंदाज येताच पालकांनी आरडाओरड केल्याने परिसरातील नागरिक घटनास्थळावर जमा झाले. याबाबत वनविभागाला घटनेची माहिती कळवल्यानंतर वनविभाग आणि पोलीस पथकाची ग्रामस्थांच्या मदतीने श्वान पथक आणि ड्रोनच्या सहाय्याने रात्री उशिरापर्यंत बालकाची शोधमोहीम सुरू होती.

'देशदूत'तर्फे आज गुरू सन्मान सोहळा

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक शहर आणि जिल्ह्यात अनेक शिक्षक व शैक्षणिक संस्था सेवाभावी वृत्तीने ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. त्यांच्या सेवाकार्याचा गौरव आणि त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी 'देशदूत'कडून शिक्षकांप्रती कृतज्ञतेचा भाव म्हणून 'गुरू सन्मान पुरस्कार' सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

देशदूत गुरू सन्मान सोहळा २०२५ पर्व ३रे

शनिवारी (दि. ९) मान्यवरांच्या हस्ते विविध शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. ज्येष्ठ विचारवंत, लेखक रावसाहेब कसबे आणि नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे या अतिथींच्या हस्ते पाच शिक्षकांना विशेष सन्मान तर बारा शिक्षकांना 'गुरू सन्मान पुरस्कार' देऊन सन्मानित केले जाणार आहे. नासिक्लब, नंदिनी पुलाजवळ, नाशिक-पुणे रोड येथे सायंकाळी पाच वाजता कार्यक्रम पार पडणार आहे.

पान ८ वर

थोडक्यात

वेबसिरीज बघून विद्यार्थ्याची आत्महत्या

बंगळुरू । येथे एका सातवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार ही घटना प्रसिद्ध जापनीज एनिमे वेब सीरीज डेथ नोटशी संबंधीत आहे. ही घटना सीके अच्युकाट्टू भागात रात्री घडली. दरम्यान पोलिसांनी या मृत्यूच्या घटनेची चौकशी सुरू केली आहे. प्राथमिक माहितीनुसार, हा अल्पवयीन मुलगा या वेब सीरिजचा मोठा चाहता होता.

◉ सोग्रसजवळ झालेल्या अपघातानंतर संतप्त नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले.

मतदार याद्यांमध्ये घोळ आम्हालाही मान्य : मुख्यमंत्री

पुणे । प्रतिनिधी

मतदार याद्यांमध्ये घोळ आहे, हे आम्हालाही मान्य आहे आणि आम्ही तर इतक्या वर्षांपासून सांगतोय की, मतदार याद्यांची सर्वसमावेशक पडताळणी करा. मात्र, निवडणूक आयोगाने जेव्हा बिहारमध्ये ही पडताळणी सुरू केली, तेव्हा राहुल गांधींनी ती थांबवण्यास सांगितले. राहुल गांधींना नेमके काय हवे

पान ८ वर

शेवटच्या रांगेवरून राजकीय वादळ

मुंबई । प्रतिनिधी

नवी दिल्लीत आयोजित इंडिया आघाडीच्या बैठकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि नेते आदित्य ठाकरे यांना शेवटच्या रांगेत बसवल्याच्या मुद्यावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपने उद्धव ठाकरे गटावर शुक्रवारी जोरदार टीकास्त्र सोडले.

जे स्वाभिमान गहाण

शिंदे, भाजपने ठाकरेंना डिवचले

टाकतात, बाळासाहेबांचे विचार सोडतात त्यांना काहीच वाटणार नाही. काँग्रेसने त्यांना त्यांची जागा दाखवली असेल, असा सणसणीत टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज लगावला. उद्धव ठाकरे भाजपसोबत होते तेव्हा मान होता, आदरातिथ्य होते. पण जेव्हा हिंदुत्व, विचारधारा सोडली तेव्हा आता पदरी अपमानाची शेवटची रांग आल्याची टीका भाजपने केली आहे. तर बैठकीतील सादरीकरणावेळी स्क्रीनच्या प्रकाशाचा डोळ्यांना त्रास होत असल्याने उद्धव ठाकरे, आदित्य आणि मी स्वत:च मागे बसलो, असा खुलासा करत ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी विरोधकांची टीका खोडून काढली.

शेअर बाजार

सेन्सेक्स	: ७९८५८ (-७६५)
निफ्टी	: २४३६३ (-२३३)

सोने-चांदी

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	१,०१,७००
२२ कॅरेट	९३,५६०
चांदी (प्रतिकिलो) १,१७,०००	

तापमान

किमान : २१.९°
कमाल : २८.३°

कांदा भाव

किमान : ६००
कमाल : १५४०
सरासरी : १३२५

भरधाव टेम्पोने विद्यार्थ्यांना चिरडले

सोग्रसजवळ अपघात; एक ठार, ११ जखमी

चांदवड । प्रतिनिधी

मुंबई-आग्रा महामार्गावर सोग्रस येथे शुक्रवारी (दि. ८) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास भीषण अपघात झाला. भरधाव छोटा हत्ती टेम्पोने (एमएच १५-३५५९) गाडीची वाट पाहत असलेल्या विद्यार्थ्यांच्या घोळक्याला जोरदार धडक दिली. यात अक्षय रमेश महाले या विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला असून, सोग्रस-माळसा परिसरातील ११ विद्यार्थी व एक महिला गंभीर जखमी झाले आहेत.

या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत घटनेचा तीव्र निषेध केला. वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली, यामुळे महामार्गावरील वाहतूक काहीकाळ थांबली होती.

या अपघातातील जखमींमध्ये लक्ष्मी शंकर गांगुर्डे, ओम शंकर अहोळा, वैष्णवी उर्फ समृद्धी सतीश पवार, रोहित साहेबराव पवार, शुभम ज्ञानेश्वर पवार, पायल शंकर गांगुर्डे, वर्षा निवृत्ती गोधडे, सविता शंकर गांगुर्डे, शुभम कैलास महाले, आदित्य शंकर गांगुर्डे, दीपक बाळू केदारे यांचा समावेश आहे.

या घटनेची माहिती मिळताच आमदार डॉ. राहुल आहेर यांनी तातडीने घटनास्थळी आणि जखमींवर उपचार सुरू असलेल्या खासगी

पान ८ वर

◉ नांदगाव जवळ मालगाडीचा घसरलेला डबा बाजूला करताना रेल्वे कर्मचारी

मालगाडी घसरली; प्रवासी गाड्या खोळंबल्या

नांदगाव । प्रतिनिधी

नांदगाव रेल्वे स्टेशनजवळ शुक्रवारी सकाळी मालगाडीचा एक डबा रुळावरून घसरल्याची घटना घडली. यामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक काहीकाळ विस्कळीत झाली होती.

नांदगाव यार्डजवळ सकाळी ७ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. ही गाडी दौंडकडे सिमेंट घेऊन जात होती. अपघातानंतर अप मार्गावर मालगाडीचा डबा आल्याने मुंबईकडे जाणाऱ्या अनेक प्रमुख रेल्वे गाड्या थांबवण्यात आल्या आणि खोळंबल्या. घटनेची माहिती मिळताच रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मनमाड येथून रेल्वेचे हायड्रॉलिक इन्स्ट्रुमेंट आणि अपघात विभागाचे पथक तत्काळ घटनास्थळी पोहोचले. जवळपास दोन तासांच्या प्रयत्नांनंतर, डबा बाजूला करून वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली. या घटनेमुळे राजधानी एक्सप्रेस, सचखंड, बनारस, दुरंतो, धुळे-मुंबई, मेमू अशा अनेक गाड्यांना विलंब झाला.

मिश्किली

सार्वजनिक जीवनात राहताना गडबड, घोटाळा- धोका सर्व काही कर..पण कधी प्रेम करू नको, मुला!

आदिवासी विकास योजनांचा बोजवारा!

आश्वासनांचा पाऊस, अंमलबजावणी मात्र शून्य

नाशिक । नरेंद्र जोशी

नाशिकमध्ये आदिवासी विद्यापीठाची स्थापना, सोसायट्यांना पुन्हा गतवैभव मिळवून देण्याचे आश्वासन, आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची भरती यांसारख्या अनेक घोषणा आजपर्यंत झाल्या. मात्र, यापैकी एकाही घोषणेची

जागतिक आदिवासी दिन विशेष

अंमलबजावणी झालेली नाही, अशी वस्तुस्थिती समोर येत आहे.

गेल्या वर्षी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी नाशिकमध्ये आदिवासी

पान ८ वर

घोटाळ्याची १४ वर्षांपासून चौकशी

२००९ पासून गाजत असलेल्या ६ हजार कोटींच्या घोटाळ्याची चौकशी गेल्या १४ वर्षांपासून सुरू आहे. यामध्ये आदिवासींसाठी गायी, म्हशी, डिझेल इंजिन, पाईप आणि इतर वस्तूंचा पुरवठा करण्याचे नियोजन होते. मात्र, आदिवासी विभागाने कोणतेही कंत्राट न काढता वस्तूंचा पुरवठा केल्याचे कागदोपत्री दाखवले. प्रत्यक्षात या वस्तू बाजारात विकल्या गेल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला होता. यावर थोडीफार कारवाई झाली असली तरी अंतिम निर्णय अजूनही बाकी आहे.

मनोमिलन बैठकीत मानापमान नाट्य

नाशिक । प्रतिनिधी

राज्यात मनसे आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या युतीच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून चांगल्याच चर्चेत आहेत. त्यातच शुक्रवारी नाशिकमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली. या मनोमिलनाच्या बैठकीत ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मानापमान नाट्य रंगल्याचे पाहायला मिळाले.

बैठकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या कार्यकर्त्यांना संबोधन करताना जिल्हाप्रमुख (ग्रामीण) जयंत दिंडे यांनी वसंत गिते यांच्या पराभवाची कारणमिमांसा सादर केली. विधानसभा निवडणुकीत वसंत गिते यांच्या प्रचारात एमडी ड्रग्जचा मुद्दा उपस्थित झाल्याने त्यांचा पराभव झाल्याचे त्यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकी दरम्यान शहरातील विविध मुद्यांवर झालेल्या चर्चेत एमडी ड्रग्जचा मुद्दा प्रचारात घेऊ नये, असे आपण सातत्याने वसंत गिते यांना सांगत होतो. मात्र विनायक पांडे यांनी विषय लावून धरल्याने त्याचा प्रचार केला व पराभवासाठी ते एक कारण ठरले, असे मत व्यक्त केले.

जयंत दिंडे यांनी सांगताच विनायक पांडे यांनी दिंडे यांना त्यांच्या या वक्तव्याबद्दल जाब विचारला व अर्वाच्य शब्दात भरसभेत त्यांचा पाणउतारा केला. या घटनेत विनायक पांडे यांना राग

पान ८ वर